महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४४ वे | दिनांक : १९/०५/२०२६ | वार : मंगळवार

## NEET पेपरफुटी प्रकरण : RCC क्लासेसच्या शिवराज मोटेगावकरला ९ दिवसांची CBI कोठडी



**लातूर** : NEET पेपरफुटीचे धागेदोरे आता जुळू लागले आहेत. या प्रकरणात आधी रसायनशास्त्राचे प्राध्यापक पी.व्ही. कुलकर्णी आणि नंतर वनस्पतिशास्त्र लेक्चरर मनीषा मांढरे यांना अटक करण्यात आली. आता NEET परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) च्या अधिकाऱ्याचाही सहभाग असल्याचे समोर येत असतानाच आता मोठी माहिती समोर आली आहे. लातूरचे प्राध्यापक शिवराज मोटेगावकरला सीबीआयने अटक केल्याचे समोर आले आहे.

शिवराज मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर विशेष सीबीआय कोर्टासमोर हजर करण्यात आले. यावेळी सीबीआयने १० दिवसांच्या कोठडीची मागणी केली. अखेर सीबीआय कोर्टाने शिवराज मोटेगावकरला ९ दिवसांची कोठडी सुनावली आहे. शिवराज मोटेगावकर हे आरसीसी क्लासेसचे संचालक असून आता त्यांची सीबीआयमार्फत चौकशी केली जाणार आहे.

सुनावणीदरम्यान सीबीआय कोर्टात न्यायाधीश आणि तपास अधिकाऱ्यांमध्ये झालेला संवाद महत्त्वाचा ठरला. न्यायाधीशांनी तपास अधिकारी पवन कौशिक यांना थेट प्रश्न विचारला की, "मोटेगावकरकडेच प्रश्नपत्रिका आहेत, हे तुम्हाला कसं कळलं?" या प्रश्नावर उत्तर देताना तपास अधिकारी कौशिक म्हणाले की, "या प्रकरणातील संशयित निवृत्त प्राध्यापक कुलकर्णी हा शिवराज मोटेगावकरच्या सतत संपर्कात होता., त्याद्वारे ही बाब समोर आली आहे. येथील कोचिंग सेंटरमार्फतच प्रश्नपत्रिकांचे वितरण सुरू होते."

याबाबत अधिकची माहिती अशी की, नीट पेपरफुटी प्रकरण केवळ राजयपूर्तेच मर्यादेत न राहता देशभरातील मोठे रॅकेट असल्याचे समोर आले आहे. यात अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे यात प्राध्यापकांचा देखील समावेश आहे. यापूर्वी दोन प्राध्यापकांना सीबीआयने अटक केली होती. आता शिवराज मोटेगावकर यांना देखील अटक करण्यात आली आहे. कारण मोटेगावकर यांचे राज्यभरात नीट परीक्षेसंदर्भात मोठे क्लासेस आहेत. गेल्याच आठवड्यात मोटेगावकर यांचे ज्या ज्या ठिकाणी क्लासेस आहेत त्या ठिकाणी छापेमारी केली होती. यावेळी काही महत्त्वाची कागदपत्रे आणि काही इलेक्ट्रॉनिक गॅझेट देखील सीबीआयने ताब्यात घेतली होती.

शिवराज मोटेगावकरला आज सीबीआयने अटक केली असून त्यांना सीबीआयच्या विशेष न्यायालयात हजर केले जाईल. त्यानंतर या संपूर्ण रॅकेटमध्ये मोटेगावकरांचा काय संबंध आहे हे समोर येणार आहे. तसेच जे प्रमुख आरोपी आहेत, लातूरचे पी.व्ही कुलकर्णी, पुण्यातल्या मनीषा मांढरे यांना देखील अटक करण्यात आलेली आहे. त्यामुळे आता या सर्वांचा एकमेकांशी काही संबंध आहे का? याचा तपास सीबीआयकडून करण्यात येत आहे. मोटेगावकर हा नीटचे पेपर फोडणाऱ्या टोळीतला सक्रिय सदस्य असल्याची धक्कादायक माहिती तपासातून समोर आली आहे.

चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार, देशभरात 3 मे रोजी नीटची परीक्षा होती. परीक्षेच्या 10 दिवस आधीच म्हणजे 23 एप्रिल रोजीच शिवराज मोटेगावकरने नीटची प्रश्नपत्रिका मिळवली होती. चौकशीत मोटेगावकरच्या मोबाइलमध्येच नीटची प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका मिळाल्याचे समोर आले आहे. शिवराज मोटेगावकरने विवेक पाटील नावाच्या एका व्यक्तीला तसेच विद्यार्थ्यांना नीटची प्रश्नपत्रिका पाठवली होती, मात्र तपास यंत्रणेसमोर तो सध्या लाभार्थी विद्यार्थ्यांची नावे सांगण्यास टाळाटाळ करत आहे. इतकेच नव्हे तर, स्वतःचा बचाव करण्यासाठी त्याने परीक्षा संपल्यानंतर या प्रश्नपत्रिकेचे सर्व तांत्रिक पुरावे देखील नष्ट केले असल्याचे तपासात समोर आले आहे. मात्र, हा डेटा तपास यंत्रणांनी रिकव्हर केल्याचे समजते. त्यामुळेच मोटेगावकर गोत्यात आला आहे.

## रोहित पवारांकडे भाजपात जाणाऱ्या राष्ट्रवादीच्या ४० लोकांची नावे - अतुल लोंढे



**मुंबई** : पवार यांच्याकडे राष्ट्रवादीतून भाजप जाणाऱ्या ४० लोकांची नावे असल्याचे सांगत एकच खळबळ उडवून दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी गत आठवड्या सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांच्यासह राष्ट्रवादीचे २२ हून अधिक आमदार भाजपकडून निवडणूक लढवणार असल्याचा दावा केला होता. त्यांच्या या दाव्यामुळे राष्ट्रवादीच्या गोटात एकच खळबळ माजली होती. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांनी उपरोक्त दावा केला आहे. तसेच रोहित पवार यांना आपल्या पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी नेमा अशी मागणीही केली आहे.

सुनील शेळके सोमवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, आम्ही सर्वच आमदार सुनेत्रा वहिनींच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहोत. काही लोक जाणिवपूर्वक षडयंत्र रचत आहेत. मला त्यांना सांगायचे आहे की, सुनेत्रा वहिनींनी पक्षाची धुरा हाती घेऊन केवळ ३ महिन्यांचा कालावधी झाला आहे. आज उपमुख्यमंत्री म्हणून त्या सक्षमपणे पदभार सांभाळत आहेत. अशा कर्तृत्वान महिलेच्या पाठीमागे आपण सर्वांनी उभे राहण्याची राहायचे की त्यांना टार्गेट करायचे हे सर्वांनी ठरवावे.

या प्रकरणी आमच्या पक्षाच्या सर्व आमदारांची व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक होईल. त्या बैठकीत मी आमदार रोहित पवार यांना आमच्या पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी नियुक्ती करण्याची मागणी मी करणार आहे, असे ते यावेळी उपरोधिकपणे म्हणाले.

दुसरीकडे, काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी राष्ट्रवादीतून भाजपमध्ये जाणाऱ्या ४० जणांची नावे आमदार रोहित पवार यांच्याकडे असल्याचा दावा केला आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेमके कोण चालवत आहे? शरद पवार, भाजप, सुनील तटकरे की प्रफुल्ल पटेल? रोहित पवार यांच्याकडे राष्ट्रवादीच्या ४० लोकांची नावे आहेत, जे भाजपमध्ये जाणार आहेत. मी रोहित पवार यांच्या विधानाशी सहमत आहे. जे पी नड्डा यांनी यापूर्वीच देशात विरोधी पक्षच अस्तित्वात राहणार नसल्याचा दावा केला होता. राष्ट्रवादीतील घटनाक्रम हा तो पक्ष फुटण्याची नांदी आहे, असे ते म्हणालेत.

## मा. खासदार देणार एकनाथ शिंदेंना धक्का; गोडसे यांच्या भूमिकेकडे लक्ष्य

**नाशिक** : सत्ताधारी शिवसेनेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या नाशिक येथील बैठकीला माजी खासदार हेमंत गोडसे यांनी दांडी मारली आहे. यामुळे हेमंत गोडसे वेगळी वाट निवडणार काय? अशी चर्चा शिवसेनेच्या गोटात सुरू झाली आहे. त्यांनी खरेच अशी भूमिका घेतली तर ती एकनाथ शिंदे यांच्यासाठी एक मोठा धक्का असेल.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेकडून राज्यभर पक्षबांधणी आणि संघटन मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. त्यासाठी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे हे विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नेत्यांच्या बैठका घेत आहेत. मात्र नाशिकमधील बैठकीत हेमंत गोडसे यांची गैरहजेरी विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

सोमवारी नाशिकमध्ये झालेल्या या बैठकीला उद्योग मंत्री उदय सामंत, शिक्षण मंत्री दादा भुसे, आमदार सुहास कांदे यांच्यासह पक्षाचे अनेक महत्त्वाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी रणनीती आखणे, संघटनात्मक बदलांवर चर्चा करणे आणि कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. त्यामुळे पक्षातील सर्व प्रमुख नेत्यांची उपस्थिती अपेक्षित होती.

मात्र, माजी खासदार हेमंत गोडसे यांनी या बैठकीला दांडी मारल्याने शिवसेनेच्या गोटात नाराजीच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून ते पक्षाच्या विविध कार्यक्रमांपासून दूर राहत असल्याचे चित्र दिसत आहे. नुकतीच नाशिकच्या संपर्कमंत्रीपदी उदय सामंत यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी घेतलेल्या बैठकीलाही हेमंत गोडसे अनुपस्थित राहिले होते. याशिवाय काही अन्य संघटनात्मक बैठकींनाही त्यांनी हजेरी लावली नव्हती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ मे २०२६


## पेट्रोल पंपावर इंधन संपल्याचे बोर्ड तर दुसरीकडे वाळूच्या गाड्या रात्रंदिवस धावतच आहेत प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह




**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे सध्या इंधनटंचाईने शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला आहे खरीप हंगामाच्या तोंडावर ट्रॅक्टर, शेतीच्या कामासाठीची यंत्रणा आणि अन्य कामासाठी डिझेल पेट्रोल मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे शेतीची कामे ठप्प पडली असून पेट्रोल पंपावर "इंधन उपलब्ध नाही " असे फलक झळकत असताना सामान्य नागरिक आणि शेतकरी रांगेत उभे राहून त्रस्त झाले आहेत. मात्र याच काळात परिसरातून वाळूच्या गाड्या सर्रास सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. रात्रंदिवस वाळूची अवैध वाहतूक सुरू असून या गाड्यांना इंधन कुठून मिळते असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारू लागले आहेत. एकीकडे शेतकऱ्याला पाच-दहा लिटर इंधनासाठी हेलपाटे मारावे लागत आहेत तर दुसरीकडे वाळूमाफियांचे वाहनांना कोणतीही अडचण न येता धंदा तेजीत सुरू आहे. असे असल्याने प्रशासनाच्या भूमिका वर संशय व्यक्त होत आहे, महसूल विभाग, वाहतूक प्रशासन, आणि संबंधित यंत्रणा यांच्याकडून केवळ डोळे झाक केली जात असल्याचा आरोप शेतकरी व सामान्य नागरिकांतून समोर येत आहे, " चिरीमिरी घेऊन अधिकारी गप्प बसलेत का? " असा संतप्त प्रश्न सामान्य जनता विचारत आहे यातच भर म्हणून स्थानिक शेतकरी संघटनेचे नेते हे झोपलेले आहेत का कारण शुल्लक कारणासाठी तहसीलवर जाऊन निवेदन आणि मोर्चा नेणारे नेते कुठेच दिसत नाहीत हा मोठा प्रश्न आहे."इंधन नाही " असा बोर्ड लावून सामान्यांना इंधन नाकारले जात आहे आणि वाळू माफियांना मात्र रान मोकळे मिळाल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेल्या या इंधनटनचा इकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन शेतकऱ्यांना प्राधान्याने इंधन उपलब्ध करून द्यावे तसेच अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाई करावी अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा संतप्त शेतकरी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील असा इशाराही देण्यात आला आहे. स्थानिक ट्रॅक्टर मालक यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी संतप्त सवाल उपस्थित केला की शेतकऱ्यांच्या कामासाठी डिझेल नाही मग वाळूच्या गाड्या कशा धावतात? शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे ट्रॅक्टर साठी डिझेल नाही शेतीची कामे खुळमले आहेत पेरणी पूर्व मशागतीची कामे थांबले आहेत पेट्रोल पंपावर गेल्यावर डिझेल संपले असे सांगितले जाते पण दुसरीकडे वाळूच्या गाड्या मात्र दिवस रात्र सुरूच दिसतात मग त्यांना इंधन कुठून मिळते असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

## किसान काँग्रेसचे पालकमंत्री शिरसाट यांच्या विरोधात आंदोलन




**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना पालकमंत्री संजय शिरसाट यांनी अडथळा आणल्याच्या निषेधार्थ किसान काँग्रेसने आज (दि. १८) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केले. मका आणि कापूस खरेदी सुरू करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले.

किसान काँग्रेसने पालकमंत्र्यांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न मांडत असताना त्यांना बोलण्यापासून रोखल्याने शेतकरी संघटनांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या घटनेनंतर किसान काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला.

जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात किसान काँग्रेसने शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांवर टीका केली. शासनाने मक्यासाठी प्रति क्विंटल २५०० रुपये हमीभाव जाहिर केला असला तरी, प्रत्यक्षात खरेदी केंद्रे सुरू नसल्याने व्यापारी केवळ १२५० रुपये प्रति क्विंटल दराने मका खरेदी करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, ग्रामीण भागातील शेतकरी आत्महत्या वाढत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. कांदा, कापूस आणि सोयाबीनचे भाव कोसळल्याने शेतकरी आधीच संकटात आहेत.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेश सचिव अनिस पटेल, किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र रमंडवाल आणि अल्पसंख्याक काँग्रेसचे शहराध्यक्ष मोईन इनामदार यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून शेतकऱ्यांचा शेतीमाल हमीभावाने खरेदी करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास किसान काँग्रेस संपूर्ण महाराष्ट्रात सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अशोक डोळस, मनपाचे माजी सभापती ॲड. इक्बालसिंग गिल, अकिप राजवी, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष संतोष शेजवळ, एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष अभिषेक शिंदे, मानवाधिकार विभागाचे अध्यक्ष शेख कैसर बाबा, काँग्रेस परिवहन विभागाचे अध्यक्ष असमत खान, महिला काँग्रेस नेत्या अनिताताई भंडारी, माजी जिल्हाध्यक्ष हेमाताई पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यस्तरीय “आदर्श प्राचार्य पुरस्काराने” डॉ. चंद्रसेन कोठावळे सन्मानित



**पाचोड (प्रतिनिधी) :** येथील शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना नुकताच राज्यस्तरीय “आदर्श प्राचार्य पुरस्कार” जगप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ पद्मश्री डॉ . तात्याराव लहाने यांच्या शुभहस्ते प्रदान करून गौरविण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थीकेंद्री उपक्रम, सामाजिक बांधिलकी तसेच प्रभावी प्रशासकीय कार्यपद्धती याची दखल घेत दैनिक दैनिक लोकनेता च्या वर्धापन दिनानिमित्त भागवत पॅलेस परळी येथे आयोजित विशेष कार्यक्रमात हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या भव्य कार्यक्रमाला जीव्हीटी संस्थेचे संस्थापक मयंक गांधी, बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे तसेच सावित्रीफेम प्रसिद्ध अभिनेत्री मेघना झुझुम, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी, पोलीस निरीक्षक नाचनसाहेब, लोकनेताचे मुख्य संपादक ज्ञानेश्वर मुंढे, त्रिसींग जायभाय यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शिक्षण क्षेत्रातील गुणवंत व्यक्तींचा गौरव होणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी गेल्या एक्केचाळीस वर्षापासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सामाजिक जनजागृती उपक्रम, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे त्यांची एक अभ्यासू आणि विद्यार्थीप्रिय प्राचार्य म्हणून ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शिवछत्रपती महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. महाविद्यालयातील शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि समाजाभिमुख उपक्रमांमुळे महाविद्यालयाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल छत्रपती संभाजीनगरचे लोकप्रिय खासदार तथा श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव संदीपान पाटील भुमरे, संस्था अध्यक्ष राजू नाना पाटील भुमरे, पैठणचे आमदार विलास बापू भुमरे, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य शिवराज भैय्या भुमरे तसेच विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील शुभचिंतक मान्यवरांनी प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांचे अभिनंदन केले आहे. राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित झाल्यानंतर पाचोडसह संपूर्ण परिसरातून प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. त्यांच्या या यशामुळे पाचोड परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ मे २०२६


## डॉ प्रभाकर शेळके यांना पद्मपाणि पुरस्कार प्रदान



**जालना :** जेष्ठ साहित्यिक कवी, कथाकार नाट्यलेखक बालसाहित्यिक डॉ प्रभाकर शेळके यांच्या एकूण साहित्यिक कारकिर्दीची दखल घेत बीड जिल्ह्यातील पद्मपाणि प्रतिष्ठानचा 'राज्यस्तरीय पद्मपाणि' पुरस्कार' आला.संस्थेचे अध्यक्ष मा.दिलिपराज तरकसे पोलिस निरीक्षक मा पल्लवी जाधव पी.एस.आय.चंद्रकात जाधववर कवी विठ्ठल जाधव भीमराव कांबळे सर,हेरकर सर,या मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.हा जालना जिल्ह्याचा प्रथम साहित्यिक सन्मान आहे.त्यांच्या या स समाजसेवक रमेश जी देहडकर,कवी कैलास भाले सुहास पोद्दार बाबासाहेब ताठे, विलास पाटील, विष्णू गायकवाड, अविनाश भंडे,प्रा.राजकुमार बुलबुले,दळवी साहेब प्रा.राजेंद्र देशमुख,भीमराव रोडे, श्रीनिवास सातभाई, अनिरुद्ध पावसे,राम कंटुले,गणेश ढाकणे, सुनील पवार,परेश पवार, डॉ धोंडोपंत मानवतकर, संतोष पाटील तांबे इ.मान्यवरांनी अभिनंदन केले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


## अनंत कदम यांना 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' पुरस्कार प्रदान




**बेळगाव :** अनंत कदम यांची जन्मभूमी होळसमुद्र- कर्नाटक तर कर्मभूमी उदगीर महाराष्ट्र असली तरी या दोन्ही राज्यांच्या सीमाभागात लेखन व मराठी भाषेचा प्रसार यासाठी दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल यांना राजारामबापू पाटील ललित कला अकादमी (महाराष्ट्र राज्य) या संस्थेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या अत्यंत प्रतिष्ठेचा ४ था 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला विशेष सन्मान २०२६' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. १५ हजार रुपये व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. भव्य दिव्य स्वरूपात संपन्न झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी अकादमीचे मार्गदर्शक, महाराष्ट्राचे माजी मंत्री, आमदार मा.जयंतराव पाटील होते. सन्माननीय अतिथी सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थानचे माजी कुलगुरू मा.डॉ. माणिकराव साळुंखे व प्रमुख पाहुणे ज्येष्ठ विचारवंत मा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या शुभहस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत अनंत कदम यांना सन्मानित करण्यात आले. प्रसिद्ध विचारवंत व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या निवड समितीने या सन्मान पुरस्कारांची निवड केली. याबरोबरच साहित्य क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाकरिता प्रसिद्ध लेखक,अनुवादक मराठी व हिंदी साहित्याचे अभ्यासक डॉ. सुनीलकुमार लवटे (कोल्हापूर) यांना 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला जीवन गौरव सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १ लाख रुपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी कवयित्री व लेखिका सिसिलिया कार्व्हालो, वसइ, दक्षिण भारतातील मराठी भाषेचे अभ्यासक डॉ. विवेकानंद गोपाल, तंजावर-तामिळनाडू, डॉ.सुरेंद्र दरेकर,अहिल्यानगर, व प्रा.डॉ. रणधीर शिंदे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा देखील यथोचित सन्मान करण्यात आला. राजारामबापू पाटील ललित कला अकादमी (महाराष्ट्र राज्य) या आमच्या संस्थेच्यावतीने ४था 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' पुरस्कार वितरण समारंभ' शब्दगंध कवी मंडळ संघ, बेळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बेळगाव येथील श्री तुकाराम महाराज सांस्कृतिक भवन येथे नुकताच संपन्न झाला.समारंभावेळी सुचिता कदम , नेहा कदम, दादाराव पाटील, मुरलीधर जाधव, शिवशंकर पाटील , नागोराव भोसले, बालाजी बिरादार , तुकाराम बिरादार, मोहन निडवंचे , वट्टमवार , मोतीराम पांचावरे , अलका पांचावरे, रेखा खोंडे, जाधव ताई, अविनाश ढगे, शिल्पा ढगे, मेघन ढगे , गोविंदराव माने, चित्रा माने याचबरोबर प्रदीप पाटील सदस्य साहित्य व संस्कृती मंडळ महाराष्ट्र राज्य , मनीषा पाटील, अनिल पाटील यांचे सह महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील अकादमीचे सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर, बेळगाव व परिसरातील साहित्याचे रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.अनंत कदम यांना मिळालेल्या या अत्यंत प्रतिष्ठेच्या सन्मानाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## देशगव्हाण येथे शिवार संसदेचे आयोजन; पाणी व पर्यावरण प्रश्नांवर चर्चा

**अंबड :** मौजे देशगव्हाण येथे सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती व 'त्रैमासिक तिफण' यांच्या वतीने शिवार संसदेचे आयोजन करण्यात येणार आहे. 'त्रैमासिक तिफण'चे संपादक डॉ. शिवाजी हुसे यांच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारा हा आगळा वेगळा उपक्रम मृग नक्षत्राच्य पार्श्वभूमीवर होणार आहे.संत भगवान बाबा मंदिर सभागृह प्रांगणात ही संसद दि. २४ मे रोजी सकाळी ८ वा. भरेल..या संसदेच्या अध्यक्षस्थानी परिसरातील ज्येष्ठ शेतकरी असतील. यावेळी माजी सरपंच, ग्रा. पं. सदस्य, वि. का. सोसायटी चेअरमन ,शालेय व्यवस्थापन परिषद पदाधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. काय होणार चर्चा या शिवार संसदेत बोगस बियाण्यांमुळे होणारे नुकसान, कालव्याच्या दुरुस्तीचा प्रश्न, जुने पाझर तलाव व्यवस्थापन, अवैध्य वाळू उपसा, पीक विम्याचे प्रलंबित अर्ज, कापसाचा बाजारभाव, पाणीटंचाई, शेतमजुरीचे दर, कापसाचे बाजारभाव , विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न सुखना बचाओ हा महत्त्वाचा विषय आणि शासकीय योजनांमधील अडचणी या विषयांवर चर्चा होणार आहे. शेतकरी, महिला, तरुण शेतकरी आपले प्रश्न थेट अधिकाऱ्यांसमोर मांडू शकणार आहेत. काही महत्वाचे ठराव या संसदेत मांडण्यात येणार आहे.डॉ. हुसे म्हणाले... 'त्रैमासिक तिफण'चे संपादक _डॉ. शिवाजी हुसे* यांनी सांगितले, "आता केवळ शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून चालणार नाही तर त्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी काम करणे महत्वाचे आहे. त्यांच्या प्रश्नाविषयी कुणालाच काहीही घेणे देणे नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न शेतकऱ्यांच्याच व्यासपीठावर सुटावेत, त्यांना तालुका, जिल्ह्याच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी शिवार संसद ही संकल्पना आहे. इथे प्रत्येक शेतकऱ्याला समान न्याय आणि बोलण्याचा हक्क मिळेल. ही लोकशाहीची खरी प्रयोगशाळा ठरेल."सर्वांना आवाहन देशगव्हाणसह पंचक्रोशीतील सर्व शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक यांनी या शिवार संसदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती व 'त्रैमासिक तिफण' यांच्या वतीने डॉ. शिवाजी हुसे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ मे २०२६

## "संवाद" संवाद कुठे हरवले ?



इकडे तिकडे शोधून पाहिले नाही कुठे सापडले... अरेच्चा ! हे तर मोबाईल मधेजाऊन बसले. बोटांना काम मिळालेतोंडाचे काम कमी झाले शब्द मुके झालेमोबाईल मधे लपून बसले'हाय' करायला मोबाईल 'बाय' करायला मोबाईल GM करायला मोबाईल GN करायला मोबाईल शुभेच्छांसाठी मोबाईल 'भावपूर्ण श्रद्धांजली' साठीही मोबाईल खरेदीसाठी मोबाईल विक्रीसाठी मोबाईल नाटक, सिनेमांची तिकिटं मोबाईल वरबस, ट्रेन, विमानाची तिकिटं मोबाईल वरशाळा, कॉलेजची फी मोबाईल वरडॉक्टरांची फी मोबाईल वरवेळंच नाही येत आता दुस-यांशी बोलण्याचीबोलता बोलता चेह-यावरचे भाव टिपण्याचीवेगवेगळ्या 'इमोजी' धावून येतात मदतीलादूधाची तहान ताकावर भागवायला आता शब्द कानांना सुखावत नाहीत.आता शब्द ओठांवर येत नाहीत.आता शब्द कोणी जपून ठेवत नाहीआता शब्द-मैफल कुठे भरतच नाही.मोबाईलवरील संवादाला अर्थ नाहीप्रत्यक्ष संवादातील मौज इथे नाहीआभासी जगातले संवादही आभासीअशा संवादांचा आनंद नाही मनासीया आभासी संवादांना*मूर्त रूप कधी मिळेल का?* नक्की सांगा माणूस खरंच*हुदयापासुन संवाद साधेल का .?

**प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे. जालना.**
भ्रमणध्वनी ~९४२१३१९२७०
(लेखक~ ललित लेखक, समीक्षक, शिक्षण तज्ञ आहेत.)

## सांस्कृतिक समृद्धता वाढवणे हे वस्तुसंग्रहालयाचे महत्त्वाचे कार्य




**छत्रपती संभाजीनगर :** वस्तुसंग्रहालय हे आपला इतिहास आणि संस्कृती जतन कार्य करत असते. या कार्याच्या माध्यमातूनच संस्कृतीची नव्याने ओळख जगासमोर नेण्याचे काम वस्तुसंग्रहालय करत असतात म्हणूनच सांस्कृतिक समृद्धता वाढवणे हे वस्तुसंग्रहालयाचे मुख्य कार्य आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांनी प्रतिपादन केले. आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिनानिमित्त सांस्कृतिक कार्य विभाग पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय संचलनालय अंतर्गत सहाय्यक अभिरक्षक,प्रादेशिक वस्तूसंग्रहालय,छत्रपती संभाजीनगर व इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वस्तूसंग्रहालय दिनानिमित्त "महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहाचा विकास" या विषयावर डॉ. तेजस गर्गे यांची व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील वस्तूसग्रहालयाचा इतिहास आणि त उदय, समृद्ध परंपरा कशी आहे याची उदाहरणे देऊन स्पष्टीकरण दिले. सध्या महाराष्ट्रामध्ये राज्य पुरातत्त्व विभागाची १४ वस्तुसंग्रहालय असून, विद्यापीठ व इतर संस्थांची ४० वस्तूसंग्रहालय आहेत व १०७ खाजगी वस्तुसंग्रहालय संपूर्ण महाराष्ट्रात असून यामध्ये चित्रकला, शिल्पकला व इतर महत्त्वाच्या वस्तू आहेत. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पैठण, सिंदखेडराजा, माहूर, सांगली, मुंबई येथे वस्तुसंग्रहालय आहेत. भविष्याचा वेध घेताना कार्पोरेट म्युझियमची वाढती व्याप्ती होत आहे. त्यामुळे नव्या पिढीला खाजगी वस्तुसंग्रअधिकारी अजित खंदारे, राज्य पुरातत्त्व खात्याच्या विभागीय सहाय्यक संचालक संचालिका जया वाहने विभागातील सर्व प्राध्यापक वृंद, राज्य पुरातत्व खात्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग व हालयामध्ये नोकरीच्या भरपूर संधी आहे. महाराष्ट्र राज्याचे मोठे वस्तुसंग्रहालय मुंबई येथे उभारण्यात येणार आहे. अशी प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचीन भारतीय संस्कृती विभागाच्या विभाग प्रमुख डॉक्टर गीतांजली बोराडे होत्या त्यांनी विद्यापीठातील वस्तू संग्रहालयाच्या निर्मितीची व भविष्यातील वेगवेगळ्या दालनांची माहिती या दरम्यान दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कामाजी डक यांनी केले तर डॉ. संजय पाईकराव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. आभार प्रियदर्शन हटकर यांनी मांडले. यावेळी विभागीय चौकशी संशोधक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## "परीक्षा झाली जुगाडाचा अड्डा"

परीक्षा झाली जुगाडाची, बेईमानीचा खेळ,
मेहनतीच्या घामावरती, बसला खोटेपणाचा मेळ...

रात्र रात्र जागुनी अभ्यास करणारा,डोळ्यांत स्वप्नं ठेवतो,
पेपर फोडणारा मात्र तिथे,हसत हसत पुढे जातो...

आई म्हणते "बाळा शिक रे", बाप कष्टाने झिजतो,
पण जुगाडाच्या वाटेवरती, खोटाडाच वर चढतो...

कोणी चिठ्ठ्या खिशात ठेवून, नियम सारे मोडतो,
कोणी पैशांच्या जोरावरती, निकाल आपला जोडतो...

ज्ञान विकत नाही मिळत,
हे सत्य कुणी जाणेना,
बेईमानीच्या बाजारात, प्रामाणिकपणा दिसेना...

दिव्याखाली गरीब मुलगा, रात्रभर अभ्यासी,
त्याच्या नशिबी चिंता येती, डोळ्यांमध्ये उदासी...

ज्याने घाम गाळून शिकले, त्याला अपयश,
आणि जुगाडाच्या माणसाला, सहजच यश..

पण वेळ कधीच थांबत नाही, सत्य लपून ना राहे,
खोटेपणाच्या पायाखाली, वाळूच शेवटी वाहे...

खरी परीक्षा जीवनाची, कागदावर नसते,
ती माणसाच्या मनातील, प्रामाणिकपणात असते...

मेहनतीचा मार्ग कठीण,
तरी विजय तिथेच असतो,
कष्टाच्या त्या घामामधुनी,
खरा माणूस घडत असतो... ॥



**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## टोमॅटोदादा

टोमॅटोदादा टोमॅटोदादा
अंग तुझे मऊ मऊ
शोभून दिसतो जणू
फुग्यांचा लहान भाऊ

लाल लाल रंगांचे
लाभले तुला वरदान
चवीला जरी आंबट
लागतोस किती छान

जेवणामध्ये आई
करते तुझी कोशिंबीर
यथेच्छ ताव मारण्यासाठी
सुटतो आमचा धिर

गोल गोल तुझे अंग
शोभून दिसते मस्त
सर्व तुला घेतात
कारण तसा तू स्वस्त

टोमॅटोदादा तुझ्या पोटात
सी जीवनसत्व भरपूर
जो तुला खाईल
तो आजारापासून दूर



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**




## थकणार नाही

यशाची वाटच,
खडतर आहे.
यशस्वी होतांना,
परीक्षाच पाहे. १

जाणूनिया घ्यावे,
यशाचे गमक.
सदैव ठेवावे,
कष्टाचे धमक. २

लढता लढता,
यश मिळवावे.
संघर्ष करून,
दु:ख पळवावे. ३

कशाला म्हणतो,
पाऊल थकले.
चालून चालून,
रणात टिकले. ४

थकणार नाही,
चालताना पाय.
सदैव सांगते.
पळताना माय. ५



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ मे २०२६

# गुरुवर्य प्रा. सुरेश पुरी : माणुसकीचा अथांग स्नेहसागर



**छत्रपती संभाजीनगर :** आपल्याला सभोवताली काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे अस्तित्व हे केवळ त्यांच्या कार्यापुरते मर्यादित राहत नाही; तर ते विचारांची, संस्कारांची, प्रेरणेची आणि माणुसकीची एक अखंड परंपरा बनून पुढील अनेक पिढ्यांच्या जीवनाला दिशा देत राहते. अशी व्यक्तिमत्त्वे काळाच्या ओघात केवळ व्यक्ती राहत नाहीत, तर ती एक संस्कारपीठ बनतात. पत्रकारिता, जनसंवाद, शिक्षण, सामाजिक बांधिलकी, विद्यार्थ्यांवरील निरपेक्ष प्रेम आणि माणुसकीच्या मूल्यांचा अथांग स्नेहसागर म्हणजे आदरणीय प्रा. सुरेश पुरी सर अर्थातच आपल्या सर्वांचे लाडके बाबा!डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे माजी विभागप्रमुख तसेच प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ अध्यापन करताना त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडविले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पत्रकारिता शिकवली नाही, तर जीवन समजून घेण्याची दृष्टी दिली. त्यांच्या वर्गात शिकवला जाणारा प्रत्येक विषय हा फक्त अभ्यासक्रमाचा भाग नसे; तो वास्तव जीवनाशी जोडलेला असे. त्यांच्या शिकवणीतून विद्यार्थ्यांना संवेदनशीलता, सामाजिक जाणीव, विचारांची स्पष्टता आणि माणुसकीचा अर्थ समजत गेला.आजच्या स्पर्धात्मक, यांत्रिक आणि मूल्यसंकटाच्या काळात प्रा. सुरेश पुरी यांच्यासारख्या शिक्षकांचे कार्य अधिक महत्त्वाचे वाटते. कारण त्यांनी पत्रकारितेला कधीच केवळ करिअर म्हणून पाहिले नाही. त्यांच्या मते पत्रकारिता म्हणजे समाजाशी असलेली नैतिक बांधिलकी. पत्रकार हा फक्त बातमी देणारा नसून समाजाच्या विवेकाचा प्रहरी असतो, ही भावना त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली.ते विद्यार्थ्यांना नेहमी सांगतात —“पत्रकार होण्यापूर्वी चांगला माणूस बना.”या एका वाक्यात त्यांच्या संपूर्ण शिक्षणतत्त्वज्ञानाचा सार दडलेला आहे. ज्ञान, पदवी, करिअर, यश आणि प्रतिष्ठा यापेक्षा माणुसकी अधिक मोठी आहे, हा जीवनमंत्र त्यांनी आपल्या कृतीतून विद्यार्थ्यांना दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ व्यावसायिक यशासाठी तयार केले नाही, तर सामाजिक जबाबदारी स्वीकारणारे संवेदनशील नागरिक घडविले.आजही हे कार्य निरंतरपणे सुरू आहे.प्रा. सुरेश पुरी यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. ते एक उत्कृष्ट शिक्षक, अभ्यासू पत्रकारिता तज्ज्ञ, प्रभावी वक्ते, साहित्यप्रेमी, हिंदी भाषेचे जाणकार तथा परीक्षामंत्री,हिंदी प्रचार सभा, हैदराबाद, संवेदनशील विचारवंत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांवर निरपेक्ष प्रेम करणारे गुरुवर्य आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा आहे, पण तो सामान्य नाही; त्यात सात्त्विकता आहे, पण ती दिखावूपणाची नाही; त्यात माणुसकी आहे, पण ती केवळ शब्दांत नाही—ती त्यांच्या प्रत्येक कृतीत आहे.त्यांनी आयुष्यभर ज्ञानदानाची साधना केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तर देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना योग्य दिशा दाखवणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. त्यांच्या शिकवणीत पुस्तकांचा गंध होता; पण त्याचबरोबर जीवनाच्या वास्तवाचा स्पर्शही होता. म्हणूनच त्यांच्या वर्गातून बाहेर पडलेले विद्यार्थी केवळ पत्रकार झाले नाहीत, तर विचारशील आणि सामाजिक जाणीव असलेले माणूस बनले.विद्यार्थ्यांशी त्यांचे नाते हे केवळ शिक्षक-विद्यार्थी इतकेच मर्यादित नव्हे तर ते विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, सल्लागार, मानसिक आधार आणि अनेक वेळा पालकही बनले. अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील कठीण प्रसंगात त्यांनी खंबीरपणे साथ दिली.आजही माझ्या सारख्या कला ,साहित्य ,संस्कृतीच्या उपासकाला मायेची उब देत असतात. कोणाच्या शिक्षणाची अडचण असो, कोणाच्या करिअरचा प्रश्न असो किंवा वैयक्तिक संकट असो—पुरी सर विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहिलेले आहेत.अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला त्यांच्या एका शब्दाने दिशा मिळाली. त्यांच्या एका कौतुकाने आत्मविश्वास वाढला. त्यांच्या एका मार्गदर्शनाने करिअर घडले. म्हणूनच आज देश-विदेशात विविध क्षेत्रात कार्यरत असलेले अनेक विद्यार्थी अभिमानाने सांगतात —“आज आम्ही जे काही आहोत, ते आदरणीय पुरी सरांमुळेच.”एखाद्या शिक्षकाची खरी कमाई ही त्याने कमावलेली संपत्ती नसते; तर त्याने घडविलेली माणसे असतात. प्रा. सुरेश पुरी यांनी अशी असंख्य माणसे घडविली, जी आज पत्रकारितेसह विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत आणि समाजसेवेत योगदान देत आहेत.प्रा. सुरेश पुरी यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची निरपेक्षता. त्यांनी कधी प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही. त्यांनी पद, पैसा किंवा सन्मान यामागे धाव घेतली नाही. विद्यार्थ्यांचे यश हीच त्यांची खरी कमाई होती. ज्ञानाचा, अनुभवाचा किंवा पदाचा किंचितही अहंकार त्यांच्या वागण्यात कधी दिसला नाही. अत्यंत साधेपणाने, पारदर्शकतेने आणि सच्चेपणाने ते आयुष्य जगत आहेत.त्यांच्या सहचारिणी विजयमाला पुरी सर्वांच्या लाडक्या (काकू)यांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांवर मायेची पखरण करणाऱ्या काकूंनी अनेक विद्यार्थ्यांना आपल्या लेकरांप्रमाणे जपले. प्रा.पुरी सरांचे घर हे विद्यार्थ्यांसाठी नेहमीच प्रेम, आधार आणि आत्मीयतेचे ठिकाण राहिले. विद्यार्थ्यांना घरच्यासारखी ऊब देणारे हे दांपत्य अनेकांसाठी प्रेरणेचे केंद्र आहे.पत्रकारिता आणि जनसंवाद क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी पत्रकारितेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. सत्य, नैतिकता, सामाजिक जाणीव, संवेदनशीलता आणि भाषेची जबाबदारी या मूल्यांचे संस्कार त्यांनी विद्यार्थ्यांवर केले. “समाजाच्या वेदनांना शब्द द्या,” हा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात कायमचा कोरला गेला आहे.आज माध्यमविश्वात वेग, स्पर्धा आणि बाजारपेठेचा प्रभाव वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत मूल्यनिष्ठ पत्रकारितेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. प्रा. सुरेश पुरी यांनी विद्यार्थ्यांना शिकवलेली पत्रकारिता ही माणसाशी जोडलेली पत्रकारिता आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना बातमीमागील वास्तव समजून घेण्याची दृष्टी दिली. गरीब, वंचित, शोषित आणि दुर्लक्षित समाजघटकांच्या प्रश्नांना आवाज देण्याचे धैर्य दिले.त्यांच्या मते पत्रकारितेचे खरे सामर्थ्य हे सत्तेला प्रश्न विचारण्यात आणि समाजाच्या दुःखाला अभिव्यक्त करण्यात आहे. पत्रकाराने निर्भय, प्रामाणिक आणि संवेदनशील असले पाहिजे, हा संदेश त्यांनी सातत्याने दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे, हे समजावून सांगितले.त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून “प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिप” ही योजना सुरू करण्यात आली, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ या राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार संघटनेच्या वतीने पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. बारामती येथे आयोजित कार्यशाळेत या स्कॉलरशिपचा शुभारंभ करण्यात आला.ही योजना केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित नाही. ती पत्रकारितेतील मूल्यसंस्कारांचा सामाजिक संकल्प आहे. आर्थिक अडचणींमुळे शिक्षण घेऊ न शकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही योजना आशेचा दीपस्तंभ ठरणार आहे. व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने तीन लाख रुपयांची ही स्कॉलरशिप उपलब्ध करून देण्यात येणार असून, निवड प्रक्रियेद्वारे पात्र विद्यार्थ्यांना मदत केली जाणार आहे.ही स्कॉलरशिप म्हणजे प्रा. सुरेश पुरी यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचे सामाजिक रूप आहे. त्यांनी आयुष्यभर विद्यार्थ्यांना उभे केले; आता त्यांच्या नावाने सुरू झालेली योजना अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणार आहे. शिक्षण आणि संस्कार यांची सांगड घालून समाजाला सक्षम पत्रकार देण्याचे हे कार्य पुढील काळात अधिक व्यापक होणार आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ समाजकार्य महाविद्यालयाच्या “स्मृती संगम-२०२४” अंतर्गत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. हा सन्मान म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या निष्ठावान कार्याची समाजाने घेतलेली दखल आहे. त्यांनी घडविलेले विद्यार्थी आज देशभर विविध क्षेत्रांत कार्यरत असून समाजसेवा करीत आहेत. हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.१९ मे हा त्यांचा जन्मोत्सव म्हणजे विद्यार्थ्यांसाठी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असतो. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी असलेला आदर हा शब्दांच्या पलीकडचा आहे. अनेक विद्यार्थ्यांसाठी ते केवळ शिक्षक नाहीत; ते जीवनाचे सारथी आहेत.“काही माणसं असतातपिंपळाच्या पानासारखी,कायमच हृदयाच्यापुस्तकात राहण्यासारखी…”या ओळी जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठीच लिहिल्या गेल्या आहेत.आजच्या काळात शिक्षकांची भूमिका केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरती मर्यादित होत चालली असताना, प्रा. सुरेश पुरी यांनी शिक्षणाला माणूस घडविण्याचे माध्यम बनवले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान दिले नाही, तर संस्कारांची बीजे पेरली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी जगण्याची प्रेरणा दिली.त्यांचे कार्य एका लेखात, एका पुस्तकात किंवा एका सन्मानात मावणारे नाही. ते अनेक पिढ्यांच्या स्मरणात जिवंत राहणारे संस्कारविश्व आहे. त्यांनी घडविलेली माणसे हीच त्यांची खरी संपत्ती आहे. त्यांच्या सहवासातून हजारो विद्यार्थ्यांना जीवनाचा अर्थ समजला, संघर्ष करण्याची ताकद मिळाली आणि समाजाशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा मिळाली.आजही तीच ऊर्जा कायम आहे.अशा या माणुसकीच्या अथांग स्नेहसागर गुरुवर्यांना स्वास्थ्यपूर्ण, निरामय आणि आनंददायी जीवन लाभो.त्यांच्या जीवनकार्याचा प्रकाश पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहो, हीच जन्मोत्सव निमित्ताने सम्यक मंगलकामना!

**- प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे,**
**संवाद:** 9822836675

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002